# महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३


क्र. मासंवि/रवका/न.क्र.२८३/ २१४१९ दिनांक : ०६/०९/२०१८

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
परिमंडळ कार्यालय - अमरावती/ अकोला/ औरंगाबाद/
भांडुप/ बारामती/ जळगांव/ चंद्रपूर/ गोंदिया/ कल्याण/ कोल्हापूर/
लातूर / नागपूर/ नांदेड/ नाशिक/ पुणे/ रत्नागिरी.

**विषय :** सामान्य आदेश क्र. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्याबाबत.

.......

सामान्य आदेश क्र. ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ अन्वये पदोन्नतीपासून वंचित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना ६/९/२८ वर्षांच्या कालावधीनंतर उच्चवेतनश्रेणीचा लाभ देण्याची योजना प्रसृत करण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेच्या अनुषंगाने वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या असून त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयांना स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सूचना तसेच उच्च वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

२. सद्यस्थितीत असे निदर्शनास आले आहे की, सामान्य आदेश ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ नुसार उच्च वेतनश्रेणीचे लाभ मंजूर करतेवेळी प्रशासकीय दिरंगाई होत असून क्षेत्रिय कार्यालयाकडून अशा प्रकरणी उच्च वेतनश्रेणी देण्याबाबतची तारीख व त्या अनुषंगाने विहीत तरतुदींअंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत या कार्यालयाकडे वारंवार मार्गदर्शन मागविले जाते, तरी याबाबत सर्व सक्षम अधिकारी यांना कळविण्यात येते की, सामान्य आदेश ७४ (क) दि. ३०.०४.१९७४ नुसार कर्मचाऱ्यास ज्या तारखेस उच्च वेतनश्रेणीचा लाभ देय आहे त्या तारखेस अस्तित्वात असणाऱ्या तरतुदी विचारात घेउन संबंधीत कर्मचाऱ्यांची उच्च वेतनश्रेणीची प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. तसेच, कर्मचाऱ्यांची उच्च वेतनश्रेणीची प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यात यावीत, अन्यथा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर :**

१) सह व्यवस्थापकीय संचालक/ प्रादेशिक संचालक, मराविविकंम, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/ कल्याण/पुणे/नागपूर.

२) कार्यकारी संचालक (मासं), मराविविकंम, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई ४०० ०५१.

D:\O&M - May 2017\GO 74 Letter.doc